# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
उद्योग" सारथी", महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक
क्षेत्र, अंधेरी (पुर्व), मुंबई - ४०० ०९३
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - ४७४८४६७९/४७४८४६९९/४७४८८३१२


---

जा.क्र.मऔविम/साप्रवि/स.से.भ./P157256 /२०२४ दिनांक : 08 JAN 2024

## सरळसेवा भरती २०२३ - सुचनापत्र

**विषय : अतिरिक्त परीक्षा शुल्क परताव्याबाबत..**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि. १४/०८/२०२३ रोजी सरळसेवा भरती - २०२३ अंतर्गत प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने ऑनलाईन अर्ज प्रक्रियेमध्ये खुला प्रवर्गातील उमेदवारांकडून रु. १०००/- अधिक रु. १८०/- GST रक्कम असे एकूण रु. ११८०/- तसेच मागासवर्गीय / आर्थिक दुर्बल घटक / अनाथ / दिव्यांग या प्रवर्गातील उमेदवारांकडून रु.९०० अधिक रु. १६२/- अशी एकूण रु. १०६२/- महामंडळाकडे जमा झालेले आहे. खुल्या प्रवर्गासाठी व मागासवर्गीय / आर्थिक दुर्बल घटक / अनाथ / दिव्यांग या प्रवर्गासाठी शासनाने नेमून दिलेल्या परीक्षा शुल्का व्यतिरिक्त अनुक्रमे रु. १८०/- व रु. १६२/- इतकी अतिरिक्त रक्कम GST च्या स्वरुपात महामंडळाकडे जमा झालेली आहे. सदर जमा झालेली अतिरिक्त GST रक्कम संबंधित उमेदवारांना परत करणेबाबत दि. ०६/०९/२०२३ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित केलेले आहे.

त्याअनुषंगाने महामंडळाकडे अतिरिक्त जमा असलेली GST च्या स्वरुपातील रक्कम संबंधित उमेदवारांनी ज्या बँक खात्यातून परीक्षा शुल्क अदा केलेले आहे, त्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत आहे. सबंधित उमेदवारांनी ज्या बँक खात्यामधून सदर रक्कम अदा केलेली आहे, त्या बँक खात्यामध्ये सदर रक्कम जमा झाली आहे किंवा नाही? याची खात्री करुन घ्यावी. सदर बाबत काही शंका / अडचणी असल्यास अथवा उमेदवारांना, त्यांचे काही म्हणणे मांडावयाचे असल्यास त्यांनी gmhrrecruitment@midcindia.org या ईमेलवर त्यांचे लेखी म्हणणे / शंका / अडचणी इत्यादी सादर करावेत.

दिनांक : ०८/०१/२०२४

ठिकाण : मुंबई

(तुषार मठकर)
महाव्यवस्थापक (मबवि)
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ